

# ५६

# वार्षिक अहवाल

## सन २०२०-२१

### व सभासद प्रशिक्षण पुस्तीका

आपल्या आकांक्षाच्या क्षितीजाला '*अर्थ*' देणारी सुवर्ण महोत्सवी बँक....
वारणा बँक


**श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर**

- प्रधान कार्यालय : वारणानगर, ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर. फोन : ०२३२८-२२४२८६/८७
- Visit : **www.waranabank.com**

# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर

## PERFORMANCE HIGHLIGHTS

(आकडे रुपये लाखात)

| तपशील | २०१९-२० | २०२०-२१ |
| --- | --- | --- |
| वसुल भाग भांडवल | ३५३५.५८ | ३५४५.९८ |
| राखीव निधी | ६९०७.०८ | ७६६५.४६ |
| स्वनिधी | १०४४२.६६ | ११२११.४४ |
| खेळते भांडवल | १०४८९८.३० | १०६७२५.७० |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण | १२.८०% | १२.६१% |
| ठेवी | ९३४८१.४९ | ९३८५४.८५ |
| कर्जे | ६११२५.८६ | ५९८८७.५६ |
| गुंतवणूक | २९८२३.७४ | ३४८०५.८७ |
| एकूण प्राप्ती | ९६९९.७२ | ९६८९.९३ |
| एकूण खर्च | ९३८८.०० | ९२१४.५६ |
| निव्वळ नफा | ३११.७२ | ४७५.३७ |
| निव्वळ एनपीए प्रमाण | ५.९२% | ४.९५% |
| प्रति कर्मचारी व्यवसाय | ४३३.०७ | ४५०.८६ |
| प्रति कर्मचारी नफा | ०.८७ | १.३९ |
| ऑडिट वर्ग | 'अ' | 'अ' |

# आमचे श्रध्दास्थान



संस्थापक

वारणा विकासाचे जनक

## सहकारमहर्षि स्व. तात्यासाहेब कोरे

सुवर्ण महोत्सवी बँक

# महाराष्ट्राचे सुराज्य स्वप्न



मा. आमदार डॉ. विनयरावजी कोरे (सावकर)
अध्यक्ष
श्री वारणा सहकारी विविध उद्योग व शिक्षण समुह,

सुवर्ण महोत्सवी बँक

# आधुनिक अर्थकारणाचे उपासक



## मा. निपुणरावजी कोरे

विद्यमान चेअरमन

सुवर्ण महोत्सवी बँक

सुवर्ण महोत्सवी बँक

# संचालक मंडळ
२०१७ ते २०२२


मा. उत्तम बा. पाटील
व्हा. चेअरमन


मा. अरविंद भा. बुद्रुक
संचालक


मा. बळवंत शं. पाटील
संचालक


मा. बाळासाहेब य. पाटील
संचालक


मा. धोंडीराम मं. सिद
संचालक


मा. महादेव हिं. चावरे (अॅडव्होकेट)
संचालक


मा. डॉ. प्रशांत म. जमने
संचालक


मा. बाबासाो गो. बावडे
संचालक


मा. डॉ. प्रताप रघुनाथ पाटील
संचालक


मा. विनायक राजाराम बांदल
संचालक



**मा. अभिजीत यशवंत पाटील**
संचालक



**मा. प्रकाश रंगराव माने**
संचालक



**मा. बाबासाो नामदेव पाटील**
संचालक



**मा. डॉ. नितीन शंकर माळी**
संचालक



**मा. सौ. शोभा प्रमोद कोरे**
संचालिका



**मा. सौ. नलिनी बसवेश्वर डोईजड**
संचालिका



**मा. सी.ए. नागनाथ अं. बसुदे**
स्वीकृत तज्ञ संचालक



**मा. सी.ए. शिल्पा बाबासाो शिनगारे**
स्वीकृत तज्ञ संचालिका



**श्री. राजेश पद्माकर सार्दळ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

## एक्झिक्युटीव्हज



**श्री. प्रकाश महादेव डोईजड**
जनरल मॅनेजर



**श्री. हेमंत अरविंद बोंगाळे**
जनरल मॅनेजर



**श्री. मकरंद सदाशिव गंगातीरकर**
जनरल मॅनेजर



सप्रेम नमस्कार..

सहकार महर्षी स्वर्गीय तात्यासाहेब कोरे यांनी सहकारातून समृध्दीचे स्वप्न बघितले.तात्यासाहेबांच्या दूरदृष्टीपूर्ण कल्पकतेवर त्यांच्या सहकार्यांनी विश्वास ठेवला आणि वारणा विविध उद्योग आणि शिक्षण समुहाच्या माध्यमातून कृषी औद्योगिक क्रांतीचा एक नवा अध्याय लिहिला गेला.याच अध्यायातील एक सुवर्णपान म्हणजेच आपली श्री वारणा सहकारी बँक.हिरक महोत्सवाकडे वाटचाल करणाऱ्या आपल्या बँकेचा ३१/०३/२०२१ अखेरचा वार्षिक अहवाल आपल्या समोर सादर करण्याच्या निमित्ताने आपल्याशी संवाद साधताना मला विशेष आनंद होत आहे.

खरे तर २०१९ च्या महापुरानं कोल्हापूर आणि सांगली या शहरांसह दोन्ही जिल्ह्यांच्या ग्रामीण भागाचे मोठे नुकसान झाले.या नुकसानीतून सावरण्या अगोदरच कोरोनाचे संकट आले.संपलेले आर्थिक वर्ष कोरोनाचा सामना करण्यातच गेले.आता संशोधकांच्या प्रयत्नांना यश येऊन कोरोना प्रतिबंधक लस उपलब्ध झाली असली तरी आपल्याला अजूनही कोरोना विषाणूला रोखण्यासाठी नियमांचे पालन करत रहावे लागणार आहे.कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी लागू झालेल्या टाळेबंदीमुळे शेती, उद्योग-व्यवसाय यांच्या विकासात मोठी बाधा आणणारी ठरली.टाळेबंदी शिथिल होऊन अर्थचक्र पुन्हा फिरु लागले असतानाच २०२१चा जुलै महिना पुन्हा एकदा महापुराचे संकट घेऊन आला.या संकटामुळे महापूर- कोरोना आणि पुन्हा महापूर तसंच अजून ठाण मांडलेला कोरोना हे दुष्टचक्र कधी थांबणार असा प्रश्न उपस्थित होत आहे.

कोरोना सारख्या आपत्तीमुळे सर्वसामान्य गृहिणींच्या किचन बजेट पासून बलाढ्य देशांच्या बजेट पर्यंत सर्वत्र चिंतेचे वातावरण आहे.पण प्रत्येक आपत्ती ही काही नव्या संधी घेऊन येत असते.त्याप्रमाणे कोरोना संकटामुळे उद्योग- व्यवसायांचे स्वरुप बदलू पाहत आहे.वर्क फ्रॉम होम सारख्या संकल्पना आता अधिक व्यापक होत आहेत.सगळेच उद्योग- व्यवसाय नव्या संधी शोधत असताना वारणा सहकारी बँक अशा संधींचे सोने करण्यासाठी शेतकरी,व्यापारी,उद्योजक यांच्या मागे भक्कमपणे उभी राहिल याची ग्वाही मी देतो. आज आपल्या बँकेच्या माध्यमातून अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाच्या योजनेचा लाभ घेतलेले अनेक तरुण स्वत:च्या पायावर भक्कमपणे उभे राहिले आहेत.

कोरोना आपत्तीचे इष्टापत्ती मध्ये रुपांतर करत बँकींग व्यवसायाचे स्वरुप सुध्दा बदलत आहे.याचाच भाग म्हणून आपल्या बँकेने सुध्दा डीजीटल बँकींग वर भर देत ग्राहकांना अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. बँकेची एटीएम, पॉईंट ऑफ सेल सुविधा, ई कॉमर्स, मोबाईल बँकींग, आयएमपीएस, आरटीजीएस, एनईएफटी या सुविधा ग्राहकांच्या पसंतीला उतरल्या आहेत.डीजीटल बँकींग व्यवहारांची व्याप्ती वाढवण्याचा भाग म्हणून बँक युपीआय आधारित पेमेंट, इंटरनेट बँकींग या सुविधा देण्यासाठी कटीबध्द आहे.

केंद्र सरकारने नागरी सहकारी बँकां वरील आरबीआयचे नियंत्रण हे ग्राहकांच्या हिताचेच असेल.त्यामुळे वारणा सहकारी बँके सारख्या ग्राहकहिताला सर्वोच्च प्राधान्य देणाऱ्या बँकेला हे नियंत्रण अडचणीचे वाटणार नाही.अर्थात नियंत्रणाच्या बरोबरीने रिझर्व्ह बँकेने राष्ट्रीयकृत बँका आणि कमर्शियल बँकां

प्रमाणेच बँकींग व्यवसायातील एक महत्त्वाचा घटक म्हणून नागरी सहकारी बँकांची सन्मानपूर्वक दखल घेणे सुध्दा तितकेच गरजेचे आहे.

आपल्या बँकेच्या माध्यमातून सभासद,ठेवीदार,ग्राहक यांच्या साठी राबवल्या जाणाऱ्या कर्ज तसेच ठेव योजनांचे आपण नेहमीच स्वागत केले आहे.आपल्या विश्वास आणि पाठबळामुळे आम्हाला त्यामध्ये नवनवीन बदल करण्यासाठी प्रोत्साहन मिळत असते.यापुढच्या काळात सुध्दा वारणा बँक प्रशासन सभासद,ठेवीदार आणि ग्राहकांचे हित जोपासण्यासाठी कटीबध्द राहिल यात शंका नाही.नियमित कर्जपरतफेड हा बँकींग व्यवसायाचा गाभा आहे.आपल्या बँकेच्या कर्जदारांनी नियमित कर्जपरतफेड करुन नेहमीच सहकार्य केले आहे.हे सहकार्य यापुढे सुध्दा कायम राहिल ही मला खात्री आहे.

बदलच शाश्वत आहे या सूत्रावर विश्वास ठेवून वारणा सहकारी बँक काळानुरुप आपल्या कार्यपध्दती मध्ये बदल करत आहे.पण स्वर्गीय तात्यासाहेबांनी घालून दिलेल्या आदर्शां पासून तसूभर सुध्दा न ढळता सहकाराचे सर्वसामान्यांच्या उध्दाराचे साध्य गाठण्यासाठी बँकेचे पदाधिकारी,संचालक आणि प्रशासन बांधिल आहे.कोरोना,महापूर यांसारख्या आपत्तींचा धीरोदात्तपणे सामना करत पुन्हा नव्याने समाजाला उभारी देण्याची ताकद सहकार क्षेत्रा मध्येच आहे.हेच सहकार तत्व जपत आपल्या आकांक्षांच्या क्षितिजाला अर्थ देण्यासाठी  वारणा सहकारी बँक सदैव आपल्या सोबत आहे..

**धन्यवाद !**

**जय सहकार !**

आपला

**निपुणराव विलासराव कोरे**

चेअरमन

# संचालक मंडळ
## ( सन २०१७–२०२२ सालाकरीता )

| अ.नं | नांव | | हुद्दा | गांव |
|---|---|---|---|---|
| १ | मा. निपुणराव विलासराव कोरे | D.M.E. A.E | चेअरमन | वारणानगर |
| २ | मा. उत्तम बाबासो पाटील | B.A. | व्हा. चेअरमन | लाटवडे |
| ३ | मा. अरविंद भाऊसो बुद्रुक | | संचालक | ऐतवडे बु॥. |
| ४ | मा. बळवंत शंकर पाटील | B.Com. | संचालक | सागांव |
| ५ | मा. बाळासाहेब यशवंत पाटील | | संचालक | सातवे |
| ६ | मा. धोंडीराम मंगू सिद | | संचालक | घुणकी |
| ७ | मा. महादेव हिंदुराव चावरे (ॲडव्होकेट) | B.Com.LLB(Spl.) | संचालक | देवाळे |
| ८ | डॉ. प्रशांत मधुकर जमने | B.A.M.S. | संचालक | कोडोली |
| ९ | मा. बाबासो गोविंद बावडे | | संचालक | बहादुरवाडी |
| १० | डॉ. प्रताप रघुनाथ पाटील | L.F.F. | संचालक | पोखले |
| ११ | मा. विनायक राजाराम बांदल | B.A. | संचालक | सावर्डे बच्चे |
| १२ | मा. अभिजीत यशवंत पाटील | B.A. | संचालक | मांगले |
| १३ | मा. प्रकाश रंगराव माने | | संचालक | भादोले |
| १४ | मा. बाबासो नामदेव पाटील | | संचालक | देवर्डे |
| १५ | डॉ. नितीन शंकर माळी | B.A.M.S. | संचालक | किणी |
| १६ | मा. सौ. शोभा प्रमोद कोरे | | संचालिका | कोडोली |
| १७ | मा. सौ. नलिनी बसवेश्वर डोईजड | | संचालिका | इचलकरंजी |
| १८ | सी.ए. नागनाथ अंबाजी बसुदे | F.C.A. | स्वीकृत तज्ञ | इचलकरंजी |
| १९ | सी.ए. शिल्पा बाबासो शिनगारे | FCA. DISA | स्वीकृत तज्ञ | मुंबई |
| २० | श्री. राजेश पद्माकर सार्दळ | M.Com. LLB (Gen), JAIIB, | मुख्य कार्यकारी अधिकारी | कोल्हापूर |

## एक्झिक्युटीव्हज

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश महादेव डोईजड | B.Com | जनरल मॅनेजर | पारगांव |
| २ | श्री. हेमंत अरविंद बोंगाळे | B.Com, MBA,CAIIB | जनरल मॅनेजर | कोल्हापूर |
| ३ | श्री.मकरंद सदाशिव गंगातीरकर | B.Sc LLB | जनरल मॅनेजर | पुणे |

# श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

## ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

सुवर्ण महोत्सवी बँक

## वार्षिक सर्वसाधारण सभा

**⁕ नोटीस ⁕**

(फक्त सभासदांकरीता)

सर्व सभासदांना कळविणेत येते कीं, आपल्या बँकेची सन २०२०-२१ ची **५६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा, गुरूवार दि.३०.०९.२०२१** रोजी **दुपारी २.०० वा. वारणानगर** येथे खालील विषयांवर विचार व निर्णय घेणेसाठी शासनाचे जा.क्र.संकीर्ण-२०२१/प्र.क्र.२४/१३-स दिनांक : ३० जुलै २०२१ चे आदेशानुसार Online पध्दतीने बोलविणेत आलेली असून सर्व सभासदांनी सदर सभेकरीता आपले ई-मेल व मोबाईल नंबर बँकेकडे सत्वर नोंद करावेत जेणेकरून ऑनलाईन हजर रहाणेसाठी लिंक पाठविणेत येईल. कोरोना महामारीमुळे शासनाचे सूचनेनुसार सदर सभा Online पध्दतीने घेणेत येणार असून प्रत्यक्ष हजर राहू नये याची नोंद घ्यावी.

**⁕ सभेपुढील विषय ⁕**

१) दि.२६.०३.२०२१ रोजी झालेल्या मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षातील बँकेच्या कामाकाजाचा अहवाल व बँकेचे वैधानिक लेखापरिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा-तोटा पत्रके मंजूर करणे.

३) संचालक मंडळाने मंजूर केलेल्या सन २०२०-२०२१ सालाचे नफा विभागणीस अंतिम मंजूरी देणे व लाभांश जाहीर करणे.

४) सन २०२०-२०२१ मध्ये अंदाजपत्रकापेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे. तसेच सन २०२१-२२ सालाकरिता खर्चाचे अंदाजपत्रक मंजूर करणे.

५) वैधानिक लेखापरिक्षक मे.काळे चौगुले ठिगळे ॲण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंटस्, इचलकरंजी यांचेकडून आलेला सन २०२०-२१ सालचा तपासणी अहवाल अवलोकनी घेणे व तो स्विकारणे तसेच सन २०१९-२० च्या वैधानिक लेखापरीक्षण अहवालाच्या दोष दुरूस्ती अहवालास मान्यता देणे.

६) बँकींग नियमन कायदा १९४९ मधील तरतुदीनुसार रिझर्व्ह बँकेच्या दि.RBI/२०२१-२२/२५ Reft.No.DoS.co.arg/sec ०१/०८.०९१.००१/२०२१-२२ Dt.२७/०४/२०२१ इ. रोजीच्या परिपत्रकान्वये संचालक मंडळाने सन २०२१-२२ सालाकरीता दोन वैधानिक लेखापरीक्षकांचा प्रस्ताव सादर केला त्यानुसार रिझर्व्ह बँकेने सन २०२१-२२ सालाकरीता केलेल्या वैधानिक लेखापरीक्षकांच्या नियुक्तीस मान्यता देणे व त्यांचा मेहनताना ठरविणेचे.

७) संचालक मंडळाने कर्जातील व्याज, दंडव्याज तसेच एक रक्कमी कर्ज परतफेड योजनेतंर्गत व इतर वसुली खर्चात दिलेल्या सवलतीस मान्यता देणे व दिर्घकाळ थकीत असलेली कर्जे बुडीत कर्ज निधी खाती निर्लेखित करणेस मंजूरी देणे.

८) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेच्या स्टाफींग पॅटर्नला मान्यता देणे.

९) संचालक मंडळ व त्यांचे नातेवाईकांना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.

१०) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांचे अनुपस्थितीस मंजुरी देणे.

११) संचालक मंडळाने शिफारस केलेल्या बँकेचा लॉग टर्म पर्सपेक्टीव्ह प्लॅनला मान्यता देणे.

१२) संचालक मंडळाने सुचविलेल्या पोटनियम दुरूस्ती प्रस्तावास मंजुरी देणे.

१३) To discuss and decide on merger /amalgamation of the Hiriyur Urban Co-operative Bank Ltd, Hiriyur, Dist-Chitrarurga, Karnataka with our Bank.

१४) मा.अध्यक्षसाो यांचे परवानगीने ऐनवेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

**संचालक मंडळाचे आदेशावरून**
राजेश पद्माकर सार्दळ
**मुख्य कार्यकारी अधिकारी**

स्थळ : वारणानगर
दिनांक : १३.०९.२०२१

**⁕ सभासदांना नम्र सुचना:**

१) आवश्यक गणपुर्ती अभावी सभा तहकूब झालेस सदरची सभा त्याच दिवशी अर्ध्या तासानंतर होईल व त्या सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

२) सभासदांना काही माहिती हवी असलेस अगर काही सूचना करावयाच्या असतील तर त्या दिनांक.२४.०९.२०२१ पर्यंत हेड-ऑफीस, वारणानगर येथे पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात.

३) पोटनियमानुसार बँकेच्या भागाची दर्शनी किंमत रू.२०००/- चे भाग धारण करणे अनिवार्य आहे. तरी ज्या सभासदांनी भाग धारणा पूर्ण केली नाही त्यांनी कृपया याची पुर्तता करावी.

४) वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या सर्व शाखांमधून दि.१३.०९.२०२१ पासून उपलब्ध होईल. तसेच बँकेच्या **www.waranabank.com** या बेवसाईटवर उपलब्ध राहील.

५) कोविड महामारीमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शासनाच्या सुचनेनुसार सदर सभा ऑनलाईन पध्दतीने घेणेत येणार असून ऑनलाईन पध्दतीद्वारेच सभेत सहभागी होता येईल याची नोंद घेवून सर्वांनी आपले ई-मेल व मोबाईल नंबर संलग्न शाखेकडे दि.२४.०९.२०२१ अखेर नोंद करावेत.

६) बँकेकडे नोंद असलेल्या मोबाईल नंबर वर सभेस **Online** पध्दतीने हजर राहणेकरीता दि.२८.०९.२०२१ व दि.२९.०९.२०२१ रोजी **Link, Login ID** व **Password** पाठविणेत येईल त्याद्वारे आपण सदर सभेस दि.३०.०९.२०२१ रोजी दुपारी १.३० नंतर **Login** होऊन आपली उपस्थिती नोंदवावी व त्या **Link** द्वारे विषयपत्रिकेवरील विषयाबाबत आपले मत नोंदवावे.

## सन २०२०-२०२१ सालचा
# ५६ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो-**

**सस्नेह नमस्कार :**

प्रथम आपल्या बँकेचे संस्थापक सहकारमहर्षी स्व.वि.आ.तथा तात्यासाहेब कोरे यांना नम्र अभिवादन करून बँकेच्या ५६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या निमीत्ताने मी सर्व सभासद बंधू, भगिनींचे मी हार्दिक स्वागत करतो.

समाजातील सर्वसामान्य माणसांच्या गरजा भागवाव्या व त्यांची आर्थिक उन्नती साधावी या उदात्त हेतूने प्रेरीत होवून कै.तात्यासाहेबांनी सहकाराच्या माध्यमाद्वारे विविध सहकारी संस्था स्थापन केल्या त्यातीलच एक सुवर्णपान म्हणजे 'श्री वारणा सहकारी बँक' होय. बँकेने रिझर्व्ह बँकेच्या धोरणांची काटेकोरपणे अंमलबजावणी, नवनवीन संकल्पना, कुशल व्यवस्थापन, नवीन तंत्रज्ञानाचा वापर, कार्यतत्पर सेवक वर्ग व उत्साही संचालक यांच्यातील उत्तम सुसंवाद, उत्कृष्ट सेवेतील सातत्य, सहकार क्षेत्रातील मान्यवरांचे मार्गदर्शन, सभासद व ग्राहक व हितचिंतक यांचे सहकार्य तसेच ठेवीदारांचा अतूट विश्वास या कारणांमुळे आपली बँक सातत्याने अभिमानास्पद अशी कामगिरी करीत आहे.

गेल्या वर्षापासूनच्या कोरोना या साथीच्या रोगाने मार्च २०२० पासून केलेला प्रादुर्भाव व त्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती, परिस्थितीनुरूप जाहीर केलेले लॉकडाऊन या अशा अनेक समस्यांना तोंड देत व त्यातुन वेगवेगळे मार्ग काढून बँक मार्गक्रमन करीत आली आहे.

मार्च-२०२१ पासून कोरोनाचा राज्यात पुन्हा एकदा दुसऱ्या लाटेचा प्रादुर्भाव झाला आहे. देशात कोरोनाच्या दुसऱ्या लाटेने थैमान घातले असतानाच आता महाराष्ट्रात डेल्टा प्लस व्हेरिएंटचे सर्वाधिक रूग्न सापडले आहेत. त्यामुळे राज्यात शासनाने नाईलाजाने एप्रिल पासून पुन्हा एकदा कडक निर्बंध लागू केले आहेत. त्यातच कोरोनाची दुसरी लाट ओसरत असतानाच तिसऱ्या लाटेचे भाकीत वर्तवीले जात आहे. याचा परिणाम सर्वच क्षेत्रावर होणार आहे.त्यात बँकींग सेवा अपवाद ठरू शकणार नाही. यासाठी शासनाने जारी केलेल्या प्रतिबंधात्मक उपाय योजना तसचे कोवीड नियमांचे पालन करावे तसेच सार्वजनीक कार्यक्रमांना जाणे टाळा अशी विनंती मी आपणा सर्वांना करतो.

कोरोना प्रादुर्भाव सुरू झाल्या पासूनच शासनाने बँकींग सेवा ही अत्यावश्यक सेवा म्हणून जाहीर केली अशा परिस्थितीतही आम्ही ग्राहकांना अखंड सेवा दिली. कोरोना संक्रमण काळात बँकेतील कर्मचाऱ्यांनी अत्यंत धीराने व संयमाने काम केले आहे व करत आहेत. परंतू या महामारीमुळे बँकेतील अनेक कर्मचारी/अधिकारी पॉझिटीव्ह आले परंतू योग्य ते उपचार होवून पूर्ण बरे होवून पुन्हा ग्राहकांच्या सेवेसाठी रूजू झाले.याकरीता सेवकांसाठी लसीकरण होणेकरीता सर्वच पातळीवर प्रयत्न केले आहेत.

रिझर्व्ह बँकेने दि.३१/१२/२०१९ चे परिपत्रकाद्वारे व्यवस्थापक मंडळ (Board of Management) गठीत करणेबाबत कळविलेले होते त्यास अनुसरून बँकेच्या पोटनियमात बदल करून त्याबाबत रिझर्व्ह बँकेस पाठविले आहे.

कोरोनाच्या संकटाशी सामना करीत असतानाच बँकेच्या प्रगतीसाठीही प्रयत्न करणे गरजेचे होते याकरीता बँकेच्या गत सभेत संदर्भ दिले प्रमाणे शेजारच्या कर्नाटक राज्यातील बँकासमवेत विलीनीकरणाबाबत कार्यवाही सुरू आहे त्यामुळे बँकेस बहुराज्य (मल्टीस्टेट) दर्जा मिळणे शक्य होणार असून याबाबत निर्णय घेवून तसा प्रस्ताव लवकरच आम्ही सादर करणार आहोत.

**आपल्या आकांक्षाच्या क्षितीजाला '*अर्थ*' देणारी सुवर्ण महोत्सवी बँक**

**वारणा बँक**

या बरोबर वर्षा पाठोपाठ आलेल्या नैसर्गिक आपत्तीने गेल्या महिन्यात सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यात मुसळधार पाऊस पडला याबरोबरच अनेक धरणातून मोठ्या प्रमाणात झालेला पाण्याचा विसर्ग, त्यामुळे पंचगंगा, कृष्णा व वारणा यासह विविध नद्यांच्या महापूराने रौद्ररुप धारण केले, महापुराने पुन्हा एकदा थैमान घालत हाहाकार माजवला, जिल्ह्यातील गावांना महापूराच्या पाण्याने वेढा घातल्यामुळे संपूर्ण जनजीवन उध्द्वस्त झाले अनेकांच्या जमिनी, राहते घर तसेच उभी पिके पाण्याखाली जावून कुजुन गेली, अनेकांची जनावरांची हानी झाली, निसर्गाच्या या महाभयंकर संकटामध्ये अनेक कुटुंबियावर ओढवलेल्या दु:खात ही सभा सहभागी आहे.

कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यात पुरग्रस्त या अस्मानी संकटाशी सामना करुन फिनीक्स पक्षाप्रमाणे पुन्हा एकदा उंच भरारी घेतील आणि त्यांना तसे बळ मिळो अशी मी श्री महालक्ष्मी चरणी प्रार्थना करतो.

तथापी आपले सहकार्य, बँकेचे हितचिंतक, प्रेम, विश्वास या जोरावरच आम्ही या प्रचंड संकटाशी सामना देवू शकलो आणि यापुढे देत राहू. या परिस्थीतीतही बँकेने केलेल्या कामकाजाचा लेखाजोखा म्हणून बँकेची ३१ मार्च २०२१ अखेरची स्थिती व ५६ वा वार्षिक अहवाल आपणा सर्व सभासदासमोर मांडणे हे माझे कर्तव्य समजतो.

गेल्या वर्षीपासून निर्माण झालेल्या कोरोना या महामारीच्या परिस्थितीत देखील बँकेने आपला ऑडिट वर्ग 'अ' ची आजवरची परंपरा अबाधित ठेवली आहे हे सांगताना मला खूप अभिमान वाटतो. स्वर्गीय तात्यासाहेब कोरे यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार आम्ही बँकेचे कामकाज करीत आहोत आणि त्यामुळेच आजपर्यंत अनेक संकटे आली आणि गेलीत प्रत्येक संकटाशी, वादळाशी झुंझ देत आज आम्ही खंबीरपणे उभे आहोत. संपूर्ण देशावर असलेले हे संकट लवकरच जाईल अशी आशा या निमीत्ताने मी व्यक्त करतो आणि या वर्षाअखेरची आर्थिक स्थिती आपणापुढे विषद करतो.

**आंतरराष्ट्रीय आर्थिक स्थिती :**२०१९-२०२० या आर्थिक वर्षाच्या अखेरच्या तिमाहीत चीन मध्ये दाखल झालेल्या कोरोना विषाणूने आता पूर्ण जग व्यापले आहे.पण या महामारीमुळे अडचणीत आलेली जागतिक अर्थव्यवस्था आता पुन्हा उभारी घेत आहे.कोरोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी टाळेबंदी सारखा पर्याय दुहेरी नुकसान करणारा असल्यामुळे सर्वच देशांनी लसीकरणावर भर देत या संकटाचा बीमोड करण्यासाठी सज्ज होण्याची गरज आहे. महामारीचा सामना करत उभारी घेत असलेल्या जागतिक अर्थव्यवस्थेला येणाऱ्या काळात अधिक बळ मिळेल अशी शक्यता आहे.जागतिक बँकेने अलीकडेच भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाढी बद्दल सकारात्मक संकेत दिले आहेत.

**राष्ट्रीय आर्थिक स्थिती :** सन २०१९-२० च्या सुरूवातीस कोरोना महामारीच्या प्रादुर्भावामुळे बिघडलेल्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेस सुधारणेस फार वाव मिळाला नव्हता तसेच सन २०२०-२१ सालात दुसऱ्या लाटेमुळे आर्थिक संकटाची तिव्रता वाढली. अर्थव्यवस्थेवर झालेल्या नकारात्मक परिणामांचा थेट दुष्परीणाम बँकींग क्षेत्रावर होतो हे सत्य आहे. यामुळे शेती क्षेत्र वगळता इतर क्षेत्रावर त्याचा जास्त व्यापक स्वरूपात परिणाम झाला. विशेषत: उत्पादक, हॉटेल, वाहतूक, दळणवळण क्षेत्रावरील परिणाम व्यापक स्वरूपाचे झाले अशा व्यवसायांना बँकांनी अर्थपुरवठा केलेने बँकींग क्षेत्रावरही त्याचा परिणाम दिसून आला.

अशा उद्योजकांची पुर्नबांधणी करणेसाठी राज्य व केंद्र सरकार यांना बाजारातून रोखे माध्यमातून मोठ्या प्रमाणात कर्जे उभी करावी लागली. रिझर्व्ह बँकेनेही महामारीच्या पहिल्या व दुसऱ्या लाटेतून उद्योगधंद्यांना दिलासा मिळावा. पुर्नरचना करणे, रू.२.०० कोटीच्या आतील कर्जदारांना २% एक्स ग्रेशिया देणे यासारख्या योजना बँकांना दिल्या. या कालावधीत लॉकडाउन व प्रतिबंधात्मक उपायामुळे डीजीटल बँकींग व्यवहारास चालना मिळाली.

**व्यवसाय वृध्दी :** या आर्थिक वर्षामध्ये कोरोना महामारीमुळे निर्माण झालेली परिस्थिती, सर्वच क्षेत्राची झालेली पिछेहाट, आर्थिक मंदी अशा परिस्थितीत सुध्दा बँकेने व्यवसायामध्ये चांगली प्रगती केलेली आहे. दि.३१/०३/२०२१ अखेर आपले बँकेचा एकूण व्यवसाय रू.१५३७.४२ कोटीहून जास्त झाला आहे.

**बँकेची दि.३१/०३/२०२१ ची आर्थिक स्थिती खालीलप्रमाणे आहे.** (आकडे लक्षमध्ये)

| तपशील | दि.३१/०३/२०२१ |
|---|---|
| भाग भांडवल | ३५४५.९८ |
| राखीव निधी | ७६६५.४६ |
| खेळते भांडवल | १०६७२५.७० |
| भांडवल पर्याप्तता प्रमाण | १२.६१% |
| ठेवी | ९३८५४.८५ |
| कर्जे | ५९८८७.५६ |
| गुंतवणूक | ३४८०५.८७ |

**भाग भांडवल व स्वनिधी :** बँकेच्या गतसालाच्या भाग भांडवलामध्ये अहवाल सालात रू.१०.४० लक्ष इतकी वाढ झाली असून एकूण भाग भांडवल दि.३१/०३/२०२१ रोजी रू.३५४५.९८ लक्ष इतके झाले आहे. याबरोबरच स्वनिधीमध्ये दि.३१/०३/२०२१ अखेर रू.७६८.७८ लक्षने वाढ होवून तो रू.११२११.४४ लक्ष इतका झाला आहे. कोणत्याही व्यवसायाची सक्षमता ही त्या व्यवसायातील भाग भांडवल व स्वनिधी यावर ठरविली जाते. भाग भांडवल व स्वनिधी हे बँकींग व्यवसायाचा पाया असून त्यावरूनच व्यवसायाचे आर्थिक स्थैर्य समजून येते. बँकेचे भांडवल पर्याप्तता प्रमाण १२.६१% इतके असून रिझर्व्ह बँकेच्या नियमानूसार किमान ९.००% इतके असणे आवश्यक आहे. आपले बँकेचे हे प्रमाण चांगले असलेने बँकेचा आर्थिक पाया भक्कम आहे.

**ठेवी :** बँकींग क्षेत्रामध्ये सध्या जीवघेणी स्पर्धा सुरू आहे. या स्पर्धेत टिकून राहणेसाठी बँकांना कसरत करावी लागत आहे. या स्पर्धात्मक परिस्थितीतही ए.एल.एम.कमिटीच्या माध्यमातून वेळोवेळी इतर बँकांच्या ठेवीचे व्याजदराचे तुलनात्मक माहितीचा अभ्यास करून ठेवीचे व्याजदर इतर बँकांचे तुलनेत आकर्षक ठेवलेले आहेत. चालू वर्षामध्ये ठेवीमध्ये रू.३७३.३६ लक्ष इतकी वाढ झाली असून एकूण ठेवी रू.९३८५४.८५ लक्ष इतक्या झालेल्या आहेत. बँकेच्या व्यवसायामध्ये झालेली वाढ म्हणजचे सभासद व ठेवीदारांचा बँकेवरील वाढता विश्वास हेच याचे प्रतीक म्हणावे लागेल.

ठेवीदारांच्या सुरक्षिततेसाठी आपली बँक डिपॉझिट इन्शुरन्स अँण्ड क्रेडीट गँरटी कार्पोरेशन या संस्थेचे सभासद असून ठेव विमा हप्ता (प्रिमीयम) नियमीत पणे पाठविते. त्यामुळे नवीन नियमानुसार रू.५.०० लक्ष पर्यंतचे ठेव विमा संरक्षण आपल्या बँकेतील ठेवीसाठी मिळत असलेने सर्वांनी आपल्या व आपल्या हितसंबंधीतांच्या ठेवी जास्तीत जास्त आपल्या बँकेत ठेवून बँकेच्या विकासात हातभार लावावा व असे आवाहन मी या निमित्ताने करतो.

राष्ट्रीयकृत व कमर्शिअल बँकांच्या तुलनेत आणि बदलत्या आर्थिक क्षेत्रातील बदलांचा परिपूर्ण अभ्यास करून बँकेने वेळोवेळी सादर केलेल्या ठेव योजनांना ग्राहकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला त्या बदल मी त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो. आम्ही ठेवीदारांचे ठेवीचे विश्वस्त आहोत. या भूमिकेतून खातेदारांचा विश्वास जपण्याचे प्रयत्न सातत्याने करीत आलो आहोत.

**कर्जे :** ठेवीदारांनी मोठ्या विश्वासाने आपले बँकेत ठेवलेला पैसा कर्जव्यवहारात गुंतवणे ही मोठी जोखीम असते अर्थव्यवस्थेतील अस्थिरता, आर्थिक मंदी या बाबींबरोबरच आपण ठेवीदारांचे ठेवींचे विश्वस्त आहोत या भुमिकेतून कर्जवितरण करताना आवश्यक ती सर्व काळजी घ्यावी लागते.

बँकींग क्षेत्रातील एकूण परिस्थिती, इतर बँकांनी व्याजदरामध्ये केलेले बदल इत्यादीचा बारकाईने अभ्यास करून घेतलेले निर्णय तसेच बँकेने अंगीकृत केलेली तंत्रशुद्ध छाननी, पारदर्शक वितरण प्रक्रिया यामुळे बँकेचा कर्ज व्यवसाय रू.५९८८७.५६ लक्ष इतका झाला आहे. बँकेच्या एकूण कर्जापैकी अग्रक्रम क्षेत्राला दिलेल्या कर्जाचे एकूण कर्जाशी प्रमाण ६१.३८ % व दुबर्ल घटकाला

दिलेल्या कर्जाचे प्रमाण १३.७९ % इतके आहे. रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार हे प्रमाण योग्य आहे व अनिवार्य स्वरूपाची असणारी लक्षांक पुर्तताही झाली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या वैयक्तिक कर्ज वाटपाच्या मर्यादेमुळे सहकार बँकाकडे होणारी मोठ्या रक्कमेची कर्ज मागणी विचारात घेवून बँकेने यापुर्वीच विविध बँकासमवेत सहभाग कर्ज योजने अंतर्गत (कन्सोर्शिअम फायनान्स) कर्ज पुरवठा करून मोठ्या कर्जदारांची आर्थिक गरज भागविली आहे यामुळे बँकेच्या एकूण कर्जामध्ये वृध्दी झाली आहे.

बँकेने वस्त्रोद्योगाच्या प्रगतीसाठी टफ अंतर्गत कर्ज पुरवठा केलेला असून त्यावर मिळणाऱ्या कॅपिटल संबसिडी बरोबरच ५% इंटरेस्ट सबसिडीचा फायदा संबंधित कर्जदारांना मिळवून दिला आहे. तसेच प्रोसेसिंग इंडस्ट्रीजसाठी टेक्नॉलॉजी अपग्रेडेशन/एस्टॅब्लीशमेंट/मॉडर्नायझेशन करीता देण्यात येणाऱ्या कर्जासाठी भारत सरकारकडून आपल्या बँकेची नोडल एजन्सी म्हणून नियुक्ती झाली आहे. याचा फायदा संबंधित कर्जदारांना मिळवून दिलेला आहे. तसेच एमएसएम ई मंत्रालय, भारत सरकार यांनी एकत्रित लिमीट रूपये एक कोटीच्या आतील कर्जासाठी २% व्याज अनुदानाचा स्किमचा लाभ बँकेने मिळणेसाठी प्रस्ताव सादर केले आहे.

**अनुत्पादीत कर्जे :** रिझर्व्ह बँकेचे धोरणानुसार ५% च्या आत एनपीए असणारी बँक सक्षम समजली जाते. बँकेने संपूर्ण वर्षभर आदर्श व्यवस्थापन पध्दतीचा अवलंब करीत नियोजन व सातत्यपुर्ण वसुली प्रक्रिया राबविली आहे. तथापी मार्च-२०२० पासून जगावर ओढविलेल्या कोरोना महामारीचा संसर्ग वाढला आणि त्यामुळे शासनाला संपूर्ण देशभर लॉकडाउन करावा लागला. त्यामुळे बँकेच्या आर्थिक परिस्थितीवर ताण निर्माण झाला या आणि अशा सर्वच कारणामुळे वसुलीवर परिणाम झाला यामुळे ३१ मार्च २०२१ अखेर बँकेचे निव्वळ एन.पी.ए.मध्ये वाढ झाली आहे. आपली कर्जखाती नियमीत करून बँकेस सहकार्य करावे अशी विनंती आपणा सर्वांना करीत आहे.

**नफा विभागणी व लाभांश :-** बँकेस दि.३१/०३/२०२१ अखेर गत सालचे शिल्लक नफ्यासह रक्कम रू.४७५.३७ लक्ष निव्वळ नफ्याची करावयाची विभागणीसाठी मा.संचालक मंडळाने खालील प्रमाणे सभा दि. ०७/०४/२०२१ ठराव नं. ५ ने शिफारस केली आहे. त्यास आपण मंजूरी देणे विषयी विनंती आहे.

| तपशील | रुपये |
|---|---|
| २५% गंगाजळी (रिझर्व्ह फंड) | १,१९,००,०००.०० |
| १०% लाभांश | ३,५२,००,०००.०० |
| शिल्लक नफा (पुढील वर्षासाठी) | ४,३७,४१२.६९ |
| एकूण... | ४,७५,३७,४१२.६९ |

**सभासद :** अहवाल सालात बँकेच्या एकूण सभासदांपैकी ४५० इतके सभासद वेगवेगळ्या कारणाने कमी झाले असून ६५० इतके नवीन सभासद झालेले आहेत. दि.३१/०३/२०२१ अखेर एकूण सभासद संख्या २५१२३ इतकी झालेली आहे.

**डिव्हीडंड :** बँकेने सन् २०२०-२१ या कालासाठी सभासदांना १०% इतका डिव्हीडंड देण्यासाठी माननीय संचालक मंडळाने शिफारस केलेली असून त्यास आपण मंजूरी देणे विषयी विनंती आहे.

**लेखापरीक्षण :** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी वैधानिक लेखापरीक्षक म्हणून मे.काळे चौगुले ठिगळे अँण्ड कपनी, चार्टर्ड अकौंटंट, इचलकरंजी यांची नेमणूक केलेली आहे. यास अनुसरून त्यांनी आपले बँकेचे मुख्य कार्यालय व ४० शाखा कार्यालय यांचे वैधानिक लेखापरीक्षण पूर्ण करून आपला अहवाल दिला आहे. अहवाल सालात बँकेस ऑडीट 'अ' वर्ग दिला आहे. सदर सनदी लेखापरीक्षक यांनी दिलेल्या मौलीक सुचना व मार्गदर्शन यांचा फायदा बँकेच्या प्रगतीस निश्चित होणार आहे.

अंतर्गत लेखापरीक्षक व स्टॉक ऑडिटर म्हणून सन २०२०-२१ या वर्षासाठी अनुक्रमे चार्टर्ड अकौंटंट मे. प्रिती पाचोरे अँण्ड असो., कोल्हापूर, मे.जे.एम.टी.अँण्ड असो., कोल्हापूर, मे.महेश गुरव अँण्ड कंपनी, मे.अमोल भंडारी अँण्ड कंपनी, पुणे, मे.अमित वर्मा अँण्ड कंपनी, मे.एच.एम.काळे अँण्ड असो., अहमदनगर, मे.ए.एस.जी.पी.डी.जी.अँण्ड कंपनी, पुणे(गुंजेवार) इत्यादी विविध फर्मनी बँकेच्या विविध शाखांचे अंतर्गत लेखापरीक्षण कामकाज पूर्ण करून बँकेने अंतर्गत लेखापरीक्षण अहवाल दिला आहे.

तसेच टॅक्स व इनव्हेस्टमेंट ऑडिट संबंधी सर्व कामकाज मे.सुशांत फडणीस अँण्ड कंपनी, चार्टर्ड अकौंटंट, कोल्हापूर यांनी पाहिले असून संगणक संबंधीचे आय.एस.व ई.डी.पी., व्ही.ए.पी.टी. व सायबर सिक्युरिटी ऑडीट मे.देशपांडे अँण्ड असोसिएटस, चार्टर्ड अकौंटंट, सांगली यांनी सर्व कामकाज पाहिले आहे.

वरील सर्व लेखापरीक्षक फर्म यांनी बँकेस वेळोवेळी सुचना व मार्गदर्शन केलेने त्याचा फायदा बँकेच्या व्यवसाय वाढीस निश्चित होईल या सर्व लेखापरीक्षक यांचे मी व्यक्तीगतरित्या आभार मानतो.

**माहिती तंत्रज्ञान : पॉझीटीव्ह पे सिस्टीम या सुविधेबाबत**- बँकेने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार सीटीएस क्लिअरींग सुरू केले असून बँकेच्या ग्राहक/खातेदार यांचेकडून रू.५०,०००/- व त्यावरील चेक इश्यु केलेल्या सर्व प्रकारच्या धनादेश पडताळणी होणेकरीता ग्राहक/खातेदार यांनी त्याबाबतची माहिती (उदा-दिनांक, चेक दिलेल्या व्यक्तिचे नांव, रक्कम इत्यादीची मोबाईल ॲप, इंटरनेट बँकींग, एसएमएस इ.) इलेक्ट्रॉनिक माध्यमातून दिली जाते.

**डोअर स्टेप बँकींग (टॅब बँकींग)**- बँकींग क्षेत्रात नवीन येत असलेल्या तंत्रज्ञान व त्यापासून ग्राहक/खातेदार यांना होणारे फायदे विचारात घेता नवीन ग्राहक/खातेदार आकर्षित होणेकरीता या आगामी वर्षामध्ये डोअर स्टेप बँकींग (टॅब बँकीग) सुविधा उपलब्ध करून देणेचा मानस आहे. याकरीता बँकेने बिझनेस करसपौंडन्ट अँण्ड बिझनेस फॅसिलेटर यांचे लाससेन्स घेतलेले आहे. या अन्वये नवीन ग्राहक/खातेदार यांचे रहिवासी असलेल्या ठिकाणी अथवा ज्या ठिकाणी उपलब्ध होतील त्या ठिकाणी जावून त्यांची सर्व प्रकारची खाती उदा-सेव्हींग, करंट, मुदत ठेव, रिकरींग ठेव, इत्यादी खाती उघडणे सोयीचे होणार आहे. या व्यतिरीक्त ग्राहक/खातेदार यांना खातेवर पैसे काढणे व भरणा करणेबाबतची सेवा सुलभतेचे होणार आहे. टॅब बँकींग सुविधा अंतर्गत बँकेने नेमलेल्या शाखाधिकारी अथवा बँकेने नेमलेले बिझनेस करसपौंडस यांच्या मार्फत सदरची सेवा पुरवली जाणार आहे.

**युपीआय पेमेंट सिस्टीम(यु.पी.आय.)**- युपीआय म्हणजे युनिफाईड पेमेंट इंटरफेस ही अशी व्यवस्था आहे त्यामुळे अनेक खात्यांना मोबाईल ॲप्लिकेशनद्वारे एकत्र आणून सोयिस्कर पैसे पाठविणे, रक्कम भरणे किंवा लाईट, पाणी, फोन इ. सर्व प्रकारची बिले डिजीटल माध्यमातून भरणा करता येणार आहेत. सदर सुविधा लवकरच बँके मार्फत आपणास देण्यात येणार आहे.

**नॉन बँकींग बिझनेस :** संस्थेची नफा क्षमता वाढविणेसाठी तसेच संस्था गुणात्मक आधारे सक्षम ठेवणेसाठी विविध उपाय शोधून आधुनिक बँकींग क्षेत्रात मार्गक्रमण करावे लागत आहे. यासाठी बँकींग व्यवसायाव्यतिरीक्त उत्पन्न वाढीसाठी निरनिराळे पर्याय शोधावे लागत आहेत. पुर्वापार चालत असलेल्या संकल्पनांना बगल देवून नवनवीन संकल्पना राबविणे बँकेसाठी आवश्यक आहे. याचाच एक भाग म्हणून बँकेने पॅनकार्ड, मोबाईल बँकींग, इत्यादी सुविधा ग्राहकांसाठी उपलब्ध करून दिल्या आहेत. याबरोबरच बँकेच्या कार्यक्षेत्रात व्यवसाय प्रतिनिधी व व्यवसाय समन्वयक यांचेमार्फत बँकींग सेवा देणेत येत आहेत. यास रिझर्व्ह बँकेने परवानगी दिली असून त्यांचेद्वारे ग्राहकांच्या दारापर्यंत बँकेच्या सेवा, ठेवी, कर्जे यांची माहिती दिली जाते. बँकेने यापूर्वीच जनरल इन्शुरन्ससाठी फ्युचर जेनेराली इन्शुरन्स कंपनी व लाईफ इन्शुरन्ससाठी एलआयसी ऑफ इंडिया यांची कार्पोरेट एजन्सी घेतलीआहे. यापुढे अशाच प्रकारच्या निरनिराळ्या सेवा सुविधा देणेचा बँकेचा प्रयत्न राहणार आहे.

**शासन योजनांची अंमलबजावणी :** शासनांच्या योजनांची प्रभावीपणे अमंलबजावणी करणेचा प्रयत्न बँक सातत्याने करीत आली आहे. देशातील सर्व नागरिकांना देशाचे अर्थ व्यवस्थेत तसेच वित्तीय सर्वसमावेशक योजनेत समाविष्ट करून घेणेसाठी त्याचबरोबर तळागाळातील नागरिकांमध्ये आर्थिक साक्षरता येणेकरीता केंद्र सरकार व राज्य सरकार यांचेकडून जाहीर झालेल्या ऑन लाईनसब-सिडीच्या योजना ह्या बँकेने यशस्वीपणे राबविलेल्या आहेत.

त्याचबरोबर देशातील तरूण लोकसंख्येचा विचार करून या तरूण मनुष्यबळास कौशल्य विकास योजनांच्या माध्यमातून कुशल बनविणे त्यांना रोजगार/स्वयंरोजगार करण्यास सक्षम करून त्यांचे जीवनमान उंचविणेच्या दृष्टीने मा.पंतप्रधानांच्या संकल्पनेस अनुसरून राज्यातील आर्थिकदृष्टया मागास घटकातील उदयोजक बनू इच्छीणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरूण वर्गाला आर्थिक सहाय्य पुरविणेच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने सादर केलेली **आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्या.** यांचे मार्फत कर्ज योजना बँकेने यशस्वीपणे राबविली आहे.

महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार इक्विटेबल मॉर्गेज योग्य दरात करून देणेची सुविधा ग्राहकांना बँकेने उपलब्ध करून दिली आहे. यामुळे कर्जदारास शासकीय कर्यालयामध्ये न जाता बँकेतच इक्विटेबल मॉर्गेज करता येणार आहे. त्यामुळे कर्जदारांचा वेळ वाचेल व शासकीय गुंतागुंत कमी होईल. आपले बँकेने ग्राहक/कर्जदार यांचेकरीता ऑनलाईन पध्दतीने ७-१२, ८-अ व प्रॉपर्टी कार्ड काढून देणेची सुविधा सुरू केली असून फक्त शासकिय शुल्काप्रमाणे रक्कम देवून आपण या सुविधेचा लाभ घेवू शकता.

**सेवक वर्ग :** कोणत्याही संस्थेची प्रगती ही सेवकांची निष्ठा व कार्यक्षमता यावर अवलंबून असते. बँकींग सारख्या सेवा क्षेत्रामध्ये कर्मचाऱ्यांचे योगदान मोठे असते आपल्या बँकेच्या प्रामाणिक, कष्टाळू सेवक वर्गावर सोपविलेली प्रत्येक जबाबदारी त्यांनी मोठ्या निष्ठेने पार पाडलेली आहे. त्यामुळे बँकेच्या प्रगतीमध्ये त्याचे योगदान फार मोलाचे आहे.

बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जनरल मॅनेजर, असि. जनरल मॅनेजर, चिफ मॅनेजर सर्व शाखाधिकारी, अधिकारी, सेवक वर्ग यांनी बँकेच्या प्रगतीत सिहांचा वाटा उचललेला आहे याचा मला व माझ्या सहकार्यांना अभिमान आहे. त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी बँक कटीबध्द आहे.

बँकेचे स्वत:चे स्टाफ ट्रेनिंग सेंटर असून या सेंटरद्वारे सर्व स्टाफला ट्रेनिंग दिले जाते त्यासाठी वेगवेगळ्या विषयातील तंज्ञ व्यक्तिंना आंमत्रीत केले जाते या व्यतिरीक्त पुणे, मुंबई, सांगली, कोल्हापूर येथील वेगवेगळ्या ट्रेनिंग संस्था, बँक असोसिएशन यांनी वेळोवेळी आयोजित केलेल्या ट्रेनिंग प्रोग्रामसाठी बँकेचे अधिकारी/कर्मचारी सातत्याने पाठविले जातात यामुळे कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता, निर्णयक्षमता या बरोबरच बँकेची उत्पादकता आणि प्रतिष्ठा वाढत आहे.

**आभार व समारोप :** सर्व सामान्य शेतकऱ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उदात्त हेतुने सहकार महर्षि कै.तात्यासाहेबांनी स्थापन केलेल्या श्री वारणा सहकारी बँकेने समाजातील सर्व सामान्य शेतकरी, कष्टकरी, व्यापारी, नोकरदार, कारखानदार या सर्वांना मदतीचा हात दिला. आज बँकेवरील या सर्वांचा दृढ विश्वास, प्रेम यामुळे प्रगतीचा आलेख सतत चढत्या क्रमाने राहीला आहे. या बरोबरच प्रामाणिकपणा व पारदर्शक कारभार ठेवत सामाजिक हिताचीही बँकेने जपणूक केली आहे. त्यामुळे ती सर्वसामान्य जनतेच्या विश्वासास पात्र ठरलेली आहे.

संपूर्ण अर्थव्यवस्थेचा विचार करता नव्या आर्थिक धोरणानुसार अनेक अर्थविषयक सुधारणा, बदल घडू लागले आहेत. पुढे येणारे प्रत्येक वर्ष आव्हानात्मक राहणार आहे. पुढील काळात बँकींग क्षेत्राने जागतिक स्पर्धेशी समर्थपणे तोंड देणारी अर्थप्रणाली विकसीत करणे, अद्ययावत तंत्रज्ञान आणि उपलब्ध मनुष्यबळाचे सुयोग्य नियोजन करणे, वास्तवदर्शक हिशेब पध्दतीचा स्विकार करणे, आधुनिकीकरण, सर्व थरातील ग्राहकांसाठी उत्कृष्ट ग्राहकाभिमुख सेवा देणे इत्यादी अनेक गोष्टींचा समावेश राहणार आहे. यासर्व गोष्टींशी बँक समरस झाली असून येणाऱ्या प्रत्येक आव्हानास सामोरे जाणेसाठी सक्षम आहे.

रिझर्व्ह बँकेचे संचालक मा.सतिश मराठेसो तसेच विभागीय सहनिबंधक, कोल्हापूर-श्री.श्रीकृष्ण वाडेकरसो, जिल्हा उपनिबंधक-श्री.अमर शिंदेसो तसेच विभागीय उपनिबंधक, सहकारी संस्था, कोल्हापूर- श्री.अरूण काकडेसो यांचे बँकेस बहुमोल मार्गदर्शन लाभले त्यांचा मी आभारी आहे.

याबरोबरच पन्हाळा शाहुवाडी मतदारसंघाचे आमदार मा.विनय कोरे (सावकर) यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनाने आपली बँक जनमाणसात मानाचे स्थान मिळवून आहे. त्यांच्या बहूमोल सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच रिझर्व्ह बँकेचे अधिकारी, सहकार खात्याचे अधिकारी, एमएससी बँक लि., मुंबई व के.डी.सी.सी. बँक लि.,

कोल्हापूरचे अधिकारी व इतर स्टाफ यांनी बँकेला वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन अतिशय मोलाचे आहे.

श्री तात्यासाहेब कोरे वारणा सहकारी साखर कारखाना लि., वारणानगर, श्री वारणा सहकारी दूध उत्पादक प्रक्रीया संघ लि., तात्यासाहेब कोरे नगर व श्री वारणा विभाग सहकारी ग्राहक मंडळ लि., वारणानगर आणि वारणा समुहातील इतर सहकारी व शैक्षणिक संस्थांचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, संचालक व अधिकारी वर्ग हे आपले बँकेस नेहमीच सहकार्य देत असतात. त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

तसेच वारणा बँकेचे कायदे सल्लागार, ऑडिटर, व्हॅल्युएटर, टेक्नीशियन, सेवा पुरवठादार यांचे मी आभार मानतो. वारणेची प्रसिध्दी, प्रसार व प्रचार या माध्यमातून ज्यांनी वारणेचा झेंडा अटकेपार नेला त्या वृत्तपत्र समुहातील सर्व घटकांचे, धुरिणांचे मी आभार मानतो.

सभासद, ग्राहक, हितचिंतक यांचे बँकेवरील प्रेम व अतूट विश्वासामुळेच ''**आपल्या आकांक्षाच्या क्षितीजाला अर्थ देणारी बँक**'' हे ब्रिदवाक्य खऱ्या अर्थाने सत्यात उतरत आहे हे मी या ठिकाणी नमूद करतो व संचालक मंडळाचे वतीने बँकेचा ५६ वा वार्षिक अहवाल, ताळेबंद,नफा-तोटा पत्रक व पूढील वर्षाचे अंदाजपत्रक आपणापूढे सादर करतो त्यास आपली मंजूरी मिळावी ही विनंती.

जून २०२० पासून बँकींग नियमन कायदा सुधारणांसह नागरी सहकारी बँकांना लागू झाला असून त्यामुळे नागरी सहकारी बँकांवर रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाची व्याप्ती वाढलेली आहे.

यापुढे बँकांना सद्या अस्तित्वात असणाऱ्या पध्दतीमध्ये आमुलाग्र बदल करणे गरजेचे असून धोरणांची व निर्देशांची पूर्तता करणे क्रमप्राप्त आहे. याप्रमाणे वेळोवेळी केलेली कार्यवाही व बदल स्विकारून काम करणेस सहकार्य मिळावे अशी विनंती आहे.

कोरोना माहामारीमुळे व शासनाचे आदेशानुसार चालू वर्षीची सभासुद्धा Online पध्दतीने घेतली जात आहे. संपूर्ण जगावरील कोरोनाचे संकट अजुनही संपलेले नसुन लवकरात लवकर ते नष्ट व्हावे, जगाला पुन्हा एकदा मोकळे, निरोगी आणि आनंदी जीवन जगन्याचे भाग्य लाभू दे अशी प्रार्थना मी श्री जोतिबा व श्री महालक्ष्मी चरणी करतो.

**धन्यवाद.**

**जय हिंद-जय महाराष्ट्र-जय सहकार**

संचालक मंडळाचे वतीने

**श्री निपुणराव विलासराव कोरे**

चेअरमन

श्री वारणा सहकारी बँक लि., वारणानगर

# ANNEXURE - A

| | | |
|---|---|---|
| **NAME OF THE BANK** | : | SHREE WARANA SAHAKARI BANK LTD;<br>WARANANAGAR. |
| **HEAD OFFICE ADDRESS** | : | AT.& POST. WARANANAGAR,<br>TAL.PANHALA, DIST. KOLHAPUR-416 113 |
| **DATE OF REGISTRATION** | : | KPR/BNK/123 DATED : 28/02/1966 |
| **DATE & NO.OF RBI LICENCE** | : | DBOD.UBD .MH.364 P 21/11/1983 |
| **JURISDICTION** | : | ENTIRE MAHARASHTRA STATE. |

**[AS ON 31 MARCH, 2021]**

(Rs. in Lacs)

| ITEMS | | 31/03/2021 |
|---|---|---|
| No. of Branches including H.O | | 40 + 1 Ext. Counter |
| Membership | Regular | 25123 |
| | Nominal | 4560 |
| Paid-up Share Capital | | 3545.98 |
| Total Reserves and funds | | 7665.46 |
| Deposits (93854.85) | Current | 5921.24 |
| | Saving | 11915.48 |
| | Fixed | 76018.13 |
| Advances (59887.56) | Secured | 57322.95 |
| | Unsecured | 2564.61 |
| | Total % of Priority Sector | 61.38% |
| | Total % of Weaker Section | 13.79% |
| Borrowings | Long Term Deposits | 292.03 |
| | Over Draft | -- |
| Investment (34805.87) | M.S.C | 15.00 |
| | D.C.C. | 12410.00 |
| | Govt.Securities. | 21451.73 |
| | Others | 929.14 |
| Overdues % (Percentage) | | 10.68% |
| Audit Classification | | 'A' |
| Profit for the Year 2020-21 | | 475.37 |
| Permanent Sub– Staff | | 102 |
| Permanent Other Staff | | 239 |
| Total Staff | | 341 |
| Working Capital | | 106725.70 |

**वैधानिक लेखापरीक्षकांचा अहवाल**

फॉर्म नं. एन-१

(महाराष्ट्र सहकारी कायदा कलम ८१ आणि नियम ६९)

प्रति,
मा. चेअरमन
**श्री वारणा सहकारी बँक, लि. वारणानगर,**
ता. पन्हाळा, जि. कोल्हापूर.

**संदर्भ :-** नियुक्तीपत्र ठराव क्रमांक ०५ संचालक मंडळ सभा दिनांक १६/१२/२०२०.

**१) आर्थिक पत्रकाबाबत लेखापरीक्षकाचा अभिप्राय-**

आम्ही श्री वारणा सहकारी बँक लि.वारणानगर,ता.पन्हाळा,जि.कोल्हापूर या सहकारी बँकेचे दिनांक ०१/०४/२० ते ३१/०३/२१ या वर्षातील आर्थिक विवरणपत्रकांचे लेखापरीक्षण केलेले असुन त्यामध्ये दि. ३१/०३/२०२१ च्या ताळेबंदाचे व त्या दिनांकास संपणा-या वर्षाच्या नफा तोटा पत्रक /उत्पन्न खर्च पत्रक आणि त्यामध्ये समाविष्ट केलेल्या हिशोबाच्या धोरणचा अर्थपुर्ण सारांश व इतर स्पष्टीकरणात्मक माहीतीचा समावेश आहे.

**२) आर्थिक विवरणपत्रकांबाबत व्यवस्थापनाची जबाबदारी :**

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० आणि त्याअंतर्गत बनविलेल्या नियमान्वये आर्थिक विवरणपत्रके व्यवस्थापनाची जबाबदारी आहे. सदर जबाबदारीमध्ये आर्थिक पत्रके तयार करतांना अपहार किंवा चुक यामुळे होणा-या लक्षणीय चुकापासुन मुक्त राहील अशा प्रकारचे अंतर्गत नियंत्रण ठेवणेबाबत संकल्पना तयार करणे आणि ते अंमलात आणणे याचा समावेश असेल.

**३) लेखापरिक्षकांची जबाबदारी :**

आर्थिक पत्रके तयार करणेची जबाबदारी संस्था व्यवस्थापनाची असुन त्यावर मतप्रदर्शन करणे ही आमची जबाबदारी आहे.आम्ही आमचे लेखापरिक्षण हे भारतीय सनदी लेखापाल संस्था यांनी तयार केलेल्या व तपासणीसाठी लागु असलेले मापदंड व महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यास अनुसरुन केलेली आहे.या मापदंडानुसार आम्हाला आमच्या तपासणीची आखणी आणि अंमलबजावणी अशा प्रकारे करावी लागते कि ज्या योगे हिशोबात लक्षणीय चुका नाहीत,याची सर्वसाधारण अशी खात्री पटेल.

**४)** लेखापरीक्षणामध्ये आर्थिक पत्रकांमध्ये दाखविलेल्या रक्कमा व केलेली विधाने याबाबतचे योग्य पुरावे मिळवणे व त्यांची तपासणी करणे यांचा अंतर्भाव असतो. लेखापरीक्षणासाठी निवड केलेली कार्यपध्दती लेखापरीक्षकाचे स्वताचे अंदाज, तसेच आर्थिक पत्रकामधील दप्तरी चुक अथवा अपहार अशी कोणतीही महत्वाची अनियमीतता यामुळे निर्माण होणारे धोके यांचे मुल्यमापन करणारी आहे. धोक्याचे मुल्यमापन करणेसाठी लेखापरीक्षणाचे नियोजन करतेवेळी परिस्थीतीस अनुसरून लेखापरीक्षक संस्थेने तयार केलेली व सादर केलेली आर्थिक पत्रकांच्या अचुकतेची खात्री करण्यासाठी संस्थेच्या अंतर्गत नियंत्रणाचा वापर करतो.लेखापरीक्षणामध्ये जमाखर्चाच्या धोरणांच्या योग्यतेच्या मुल्यमापनासह व्यवस्थापणाने जमाखर्चाच्या केलेल्या अंदाजाबाबत योग्य निष्कर्ष काढणे तसेच आर्थिक पत्रकांच्या सादरीकरणाचे योग्य मुल्यमापन करणे याचा समावेश होतो.

**५)** लेखापरीक्षण कार्यातुन मिळालेला पुरावा हा आमच्या लेखापरिक्षनाच्या मतास पुरकता देत असल्याबाबतची आम्हास खात्री झाली आहे.

**६)** आमच्या लेखापरिक्षणासाठी माझ्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर तर सर्व माहीती, पुरेसे पुरावे आणि खुलासे

आम्हास उपलब्ध झाले आहे.

**अभिप्राय :**

७) आमच्या मते आणि आम्हास माहिती व खुलाशाच्या आधारे व आवश्यक असलेल्या माहीतीच्या आधारे सदर संस्थेस हिशोब व एकत्रीत दिलेल्या टिप्पणी या महाराष्ट्र सहकारी संस्थांचा १९६० कायदा, महाराष्ट्र सहकारी संस्था नियम १९६१ व इतर लागु असलेल्या कायद्यानुसार तसेच संस्थासाठी लागणारे निबंधकाने वेळोवेळी जारी केलेले पतीपत्रकानुसार आणि भारतामध्ये वापरल्या जाणाऱ्या हिशोबी तत्वानुसार सत्य व रास्त स्थिती दर्शवितात.

अ) ताळेबंदाच्या बाबतीत दि. ३१/०३/२०२१ अखेरची संस्थेची स्थिती आणि

ब) नफा / तोटा पत्रकांच्या बाबतीत या दिनांकास संपणाऱ्या वर्षाच्या अगर मुदतीच्या संस्थेच्या नफ्याची/तोट्याची आमच्या सोबत जोडलेल्या लेखापरीक्षण अहवाल भाग अ, ब व क मधील केलेल्या अवलोकनास पात्र राहुन सत्य व रास्त स्थिती **दर्शवित आहे.**

**८) इतर कायदेशीर नियमावली संदर्भात अभिप्राय -**

ताळेबंद व नफ़ा तोटापत्रकाचे महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियमातील तरतुदीनुसार तयार करणेत आलेली आहे.

९) आम्ही असा अहवाल करतो की

अ) लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी, आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहीतीप्रमाणे आणि विश्वासानुसार आम्हास जरुर ती सर्व माहिती व खुलाशे उपलब्ध झाले आहेत आणि ते समाधानकारक आहेत.

ब) आमच्या तपासणीतुन जितपत दृष्टीत्पतीस येइल त्याप्रमाणे संस्थेने केलेले व आम्ही तपासलेले सर्व व्यवहार संस्था अधिकाराच्या मर्यादेतच केलेले आहेत.

क) लेखापरीक्षणाच्या उद्देशासाठीची संस्थेच्या शाखा आणि कार्यालयाकडून प्राप्त झालेली विवरणपत्रके योग्य व परीपुर्ण आहेत.

१०) आमच्या मते ताळेबंद व नफा तोटा पत्रक / उत्पन्न खर्च पत्रक यांचे भारतामध्ये सर्व मान्य अकौंटींग तत्वांचे एल.एफ.ए.आर.रिपोर्टमधील मुद्दा ८ अ वगळुन अनुपालन लेखांकन मानकाप्रमाणे आहे.

११) आम्ही असा अहवाल देतो की,

१) अहवालासोबत जोडलेला ताळेबंद व नफातोटा पत्रक / उत्पन्न खर्च पत्रक ही संस्थेच्या हिशोब पुस्तके व विवरणपत्रकांशी सुसंगत आहे.

२) आमच्या मते आमच्या दप्तर तपासणीत जितपत दृष्टीत्पत्तीस येईल, त्याप्रमाणे संस्थेने कायद्यानुसार आवश्यक व योग्य ती सर्व हिशोबपुस्तके ठेवली आहेत.

३) शाखांच्या जमाखर्चाचे शाखा लेखापरीक्षकांनी तपासलेले अहवाल आमच्या आवश्यकतेप्रमाणे व अहवाल तयार करणेच्या गरजेनुसार विचारात घेतले असुन सुसंगत आहेत.

४) संस्थेस चालु तपासणी कालावधीसाठी ऑडीट वर्ग '' अ '' देण्यात आलेला आहे.

सही
लेखापरीक्षकाचे नांव : काळे चौगुले ठिगळे ॲन्ड कंपनी
पदनाम : चार्टर्ड अकौंटंट्स, इचलकरंजी
मेंबरशिप नंबर : ०४८४८४
ऑडीट पॅनल नंबर : १०७६२
FRN No. : 114643 W
UDIN-21048484AAAAEM9079

स्थळ : इचलकरंजी.
दिनांक : ३१-०८-२०२१

दिनांक : ३१/०३/२०२१

| भांडवल व देणी | शेड्युल | ३१/०३/२०२० रू. पै. | ३१/०३/२०२१ रू. पै. |
|---|---|---|---|
| भाग भांडवल | I | ३५३५५७७००.०० | ३५४५९७३००.०० |
| गंगाजळी व इतर निधी | II | ६९०७०८३०१.८३ | ७६६५४६५५१.८३ |
| घेतलेली कर्जे | III | २९२०३१३६.०० | २९२०३१३६.०० |
| ठेवी | IV | ९३४८१४९२१४.२६ | ९३८५४८५१५३.८८ |
| वसुलीची बिले | | ३२९१८८.०० | ०.०० |
| शाखा मेळ | | ०.०० | ०.०० |
| थकव्याज तरतुद निधी | | १५३०७९१८३.१२ | २१७३१९२२५.६४ |
| देणे व्याज | V | ७८८३३७७.०० | ७४८६६३१.०० |
| इतर देणी व तरतुदी | VI | २९१५७५५०.१६ | ८१७१०७९२.०१ |
| मागील सालचा नफा | | १९४.२६ | १७८.१८ |
| नफा | | ३११७०९८३.९२ | ४७५३७२३४.५१ |
| | | | |
| | **एकूण :** | **१०६४३२३८८२८.५५** | **१०८८९८८६२०३.०५** |
| बँकेने सभासदांकरीता स्विकारलेल्या तारण जबाबदा-या (बँक गॅरंटी) | | १४५००८३८.९४ | २०४३५१७१.९४ |
| इतर DEAF रक्कम वर्ग | | ५६५६१०५.४८ | ८८७१७२६.६७ |
| **एकूण** | | २०१५६९४४.४२ | २९३०६८९८.६१ |

**श्री. मकरंद स. गंगातिरकर**
जनरल मॅनेजर

**श्री. हेमंत अ. बोंगाळे**
जनरल मॅनेजर

**श्री. प्रकाश म. डोईजड**
जनरल मॅनेजर

**काळे चौगुले ठिगळे ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंटस्, इचलकरंजी.
**वैधानिक लेखापरिक्षक**
फर्म रजि.नं. : 114643 W

## अखेरचे ताळेबंद पत्रक

| जिंदगी व येणी | शेड्युल | ३१/०३/२०२० रू. पै. | ३१/०३/२०२१ रू. पै. |
|---|---|---|---|
| रोख व बँकेतील शिल्लक | VII | ५२३७४६७२१.२० | ५७९१३७०३२.१३ |
| मागणी व अल्पसूचना ठेवी | VIII | २६००००००००.०० | ०.०० |
| गुंतवणूक | IX | २९८२३७३९३६.०० | ३४८०५८६६८८.०० |
| कर्जे | X | ६११२५८५८१८.०० | ५९८८७५६१२२.८२ |
| येणे व्याज | XI | १९०६४४०६४.२३ | २६१३८१८२०.६४ |
| वसुलीची बिले | | ३२९१८८.०० | ०.०० |
| शाखा मेळ | | ०.०० | ०.०० |
| स्थावर मालमत्ता | XII | ५१६४०९७७०.९२ | ५०८०९५११८.८० |
| इतर येणी | XIII | ५७१४९३३०.२० | ७१९२९४२०.६६ |
| | | | |
| **एकूण :** | | **१०६४३२३८८२८.५५** | **१०८८९८८६२०३.०५** |

**श्री. राजेश पद्माकर सार्दळ**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**मा. उत्तम बाबासाो पाटील**
व्हा. चेअरमन

**मा. निपुणराव विलासराव कोरे**
चेअरमन

**संचालक मंडळ**

मा. अरविंद भाऊसाो बुद्रुक
मा. ॲड. महादेव हिंदुराव चावरे
मा. विनायक राजाराम बांदल
मा. डॉ. नितीन शंकर माळी
मा. सी.ए. शिल्पा बाबासाो शिनगारे
मा. बळवंत शंकर पाटील
मा. डॉ. प्रशांत मधुकर जमने
मा. अभिजीत यशवंत पाटील
मा. सौ. शोभा प्रमोद कोरे
मा. बाळासाहेब यशवंत पाटील
मा. बाबासाो गोविंद बावडे
मा. प्रकाश रंगराव माने
मा. सौ. नलिनी बसवेश्वर डोईजड
मा. धोंडीराम मंगू सिद
मा. डॉ. प्रताप रघुनाथ पाटील
मा. बाबासाो नामदेव पाटील
मा. सी.ए. नागनाथ अंबाजी बसुदे

दिनांक : ३१/०३/२०२१

| खर्च | शेड्युल | ३१/०३/२०२० रू. पै. | ३१/०३/२०२१ रू. पै. |
|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावरील दिलेले व्याज | XIV | ६३५३९६८६८.२७ | ५७९३६६३१०.७३ |
| पगार, भत्ते व प्रॉ. फंड इ. | XV | १०९८४११०५.५४ | १०३३५६९८०.१७ |
| स्थावर व इतर मिळकतीवरील नफा/ तोटा | | ०.०० | ४८३४१२.०९ |
| संचालक मंडळ भत्ते | XVI | १०८५६९३.०० | ५३८७४०.०० |
| भाडे,कर, वीज, विमा इ. | XVII | ३३०४४४१६.७७ | २८२१५९०६.६८ |
| कायदे विषयक खर्च | | १८७५४६.०० | १९६४७.०० |
| टपाल, तार व टेलिफोन | XVIII | ३२७३८८२.०४ | २९१०३१२.१६ |
| लेखापरिक्षण फी | | २६४४७६२.६० | २४०८६८३.०० |
| घसारा व दुरूस्ती खर्च | XIX | ४०६५२४३१.६४ | ४६३०५९४७.०९ |
| स्टेशनरी, छपाई व जाहीरात खर्च | XX | ८५८८२२०.२५ | ५५०२६६३.०६ |
| इतर खर्च | XXI | ८०५२६०४२.३२ | ४६०१४००७.१२ |
| तरतुदी | XXII | २३५६०००००.०० | १०६३३४०००.०० |
| नफा | | ३११७०९८३.९२ | ४७५३७२३४.५१ |
| **एकूणः** | | **९६९९७१९५२.३५** | **९६८९९३८४३.६१** |

**श्री. मकरंद स. गंगातिरकर**
जनरल मॅनेजर

**श्री. हेमंत अ. बोंगाळे**
जनरल मॅनेजर

**श्री. प्रकाश म. डोईजड**
जनरल मॅनेजर

**काळे चौगुले ठिगळे ॲन्ड कंपनी**
चार्टर्ड अकौंटंटस्, इचलकरंजी.
**वैधानिक लेखापरिक्षक**
फर्म रजि.नं. : 114643 W



मोबाईल बँकिंग, इंटरनेट बँकिंग चा पासवर्ड वारंवार बदलत रहा.

## अखेरचे नफा-तोटा पत्रक

| उत्पन्न | शेड्युल | ३१/०३/२०२० रू. पै. | ३१/०३/२०२१ रू. पै. |
|---|---|---|---|
| कर्जे व गुंतवणुकीवरील मिळालेले व्याज | XXIII | ८८५९४८२६९.०२ | ८६२५७८८४२.०८ |
| कमिशन व हुंडणावळ | | २३३११९१.४१ | २५१३७९१.०८ |
| स्थावर व इतर मिळकतीवरील नफा | | ८४५६२२.०६ | ०.०० |
| गव्हर्मेंट सिक्युरिटी व म्युच्युअल फंड व्यवहारातील नफा | | ३१०४४०४०.२४ | ५४८६६८९५.८४ |
| इतर जमा | XXIV | ४९८०२८२९.६२ | ४९०३४३१४.६१ |
| एकूण: | | ९६९९७१९५२.३५ | ९६८९९३८४३.६१ |

| | | |
|---|---|---|
| **श्री. राजेश पद्माकर सार्दळ** | **मा. उत्तम बाबासो पाटील** | **मा. निपुणराव विलासराव कोरे** |
| मुख्य कार्यकारी अधिकारी | व्हा. चेअरमन | चेअरमन |

### संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| मा. अरविंद भाऊसो बुद्रुक | मा. बळवंत शंकर पाटील | मा. बाळासाहेब यशवंत पाटील | मा. धोंडीराम मंगू सिद |
| मा. ॲड. महादेव हिंदुराव चावरे | मा. डॉ. प्रशांत मधुकर जमने | मा. बाबासो गोविंद बावडे | मा. डॉ. प्रताप रघुनाथ पाटील |
| मा. विनायक राजाराम बांदल | मा. अभिजीत यशवंत पाटील | मा. प्रकाश रंगराव माने | मा. बाबासो नामदेव पाटील |
| मा. डॉ. नितीन शंकर माळी | मा. सौ. शोभा प्रमोद कोरे | मा. सौ. नलिनी बसवेश्वर डोईजड | मा. सी.ए. नागनाथ अंबाजी बसुदे |
| मा. सी.ए. शिल्पा बाबासो शिनगारे | | | |

| तपशिल | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ |
|---|---|---|
| शेड्युल - I भाग भाडंवल | रू. पै. | रू. पै. |
| अधिकृत भाग भांडवल-रू. १०००/- चे भाग याप्रमाणे | **५००००००००.००** | **५००००००००.००** |
| वसुल भागभांडवल | | |
| १) वैयक्तीक | ३५३५५७७००.०० | ३५४५९७३००.०० |
| २) सहकारी संस्था | ०.०० | ०.०० |
| ३) राज्य सरकार | ०.०० | ०.०० |
| | **३५३५५७७००.००** | **३५४५९७३००.००** |
| शेड्युल - II गंगाजळी व इतर निधी | रू. पै. | रू. पै. |
| १) गंगाजळी निधी | १३९०२५६६३.९६ | १४७३८६२९३.९६ |
| २) इमारत निधी | २९९५००००.०० | २९९५००००.०० |
| ३) रोखे चढ उतार निधी | १२९१८०००.०० | १३६५७०००.०० |
| ४) गुंतवणूक घसारा निधी | २००५००.०० | १४९२४५५.०० |
| ५) बुडीत व संशयीत कर्ज निधी | ५५९३२९३८.६२ | ५५९३२९३८.६२ |
| ६) ग्रामीण बुडीत व संशयीत निधी | १३७४१२५००.०० | २०५८५९७५०.०० |
| ७) स्टँडर्ड असेट निधी | २४००००००.०० | २६२५००००.०० |
| ८) धर्मादाय निधी | ४३५००.०० | ४३५००.०० |
| ९) आकस्मिक खर्च निधी | २५९३००.०० | २५९३००.०० |
| १०) सुवर्ण महोत्सव निधी | ५२६४०१२.०० | ५२६४०१२.०० |
| ११) पुर्न:मुल्यांकन निधी | २८५७०१८८७.२५ | २७३४५१३०२.२५ |
| १२) जनरल प्रोव्हिजन (RP) | ०.०० | ७००००००.०० |
| | **६९०७०८३०१.८३** | **७६६५४६५५१.८३** |
| शेड्युल - III घेतलेली कर्जे | रू. पै. | रू. पै. |
| १) जिल्हा मध्यवर्ती बँकेकडून घेतलेली कर्जे | ०.०० | ०.०० |
| २) इतर बँकांकडून घेतलेली कर्जे | ०.०० | ०.०० |
| ३) दिर्घ मुदतीच्या ठेवी | २९२०३१३६.०० | २९२०३१३६.०० |
| | **२९२०३१३६.००** | **२९२०३१३६.००** |
| शेड्युल -IV ठेवी | रू. पै. | रू. पै. |
| **१) चालु ठेवी** | ५५३६०७२४१.६५ | ५९२१२३९४०.७० |
| अ) वैयक्तीक | ३७७४६४९१३.७३ | ४३६७४३५४५.९२ |
| ब) सहकारी संस्था | १७६१४२३२७.९२ | १५५३८०३९४.७८ |
| **२) बचत ठेवी** | ११२६३५३७०१.१७ | ११९१५४८४६८.५४ |
| अ) वैयक्तीक | १०९९२२६३१४.३३ | ११६०७३४७४३.५१ |
| ब) सहकारी संस्था | २७१२७३८६.८४ | ३०८१३७२५.०३ |
| **३) मुदत ठेवी** | ७६६८१८८२७१.४४ | ७६०१८१२७४४.६४ |
| अ) वैयक्तीक | ४६९६८२२५५४.४४ | ४८३३४७७१४०.६४ |
| ब) सहकारी संस्था | २९७१३६५७१७.०० | २७६८३३५६०४.०० |
| | **९३४८१४९२१४.२६** | **९३८५४८५१५३.८८** |

| तपशिल | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ |
|---|---|---|
| शेड्युल - V देणे व्याज | रू. पै. | रू. पै. |
| १) ठेवीवरील देणे व्याज | ७८८३३७७.०० | ७४८६६३१.०० |
| | **७८८३३७७.००** | **७४८६६३१.००** |
| शेड्युल - VI इतर देणी व तरतुदी | रू. पै. | रू. पै. |
| १) ड्राफ्ट पेयेबल | ६७८२६५८.१३ | ३८८३१३८.५० |
| २) अनपेड डिव्हिडंड | १७४१४२०.०० | १४९८०६०.०० |
| ३) सेव्हींग सस्पेन्स | २५९०५३.०० | ७३२७७७.०० |
| ४) अनामत | १०२३९३५.९० | ६०६८५१.९० |
| ५) रिकव्हरी सरचार्ज | ०.०० | ०.०० |
| ६) ऑडिट फी | १४२९५००.०० | १५००७५०.०० |
| ७) नोकर उत्तेजनार्थ बक्षिस | ०.०० | ८५०००००.०० |
| ८) लॉकर भाडे ॲडव्हान्स | ३५०९८२.०० | ०.०० |
| ९) इतर देणी | १४५७०००१.१३ | २१००५२१४.६१ |
| १०) इन्कमटॅक्स तरतुद | ३००००००.०० | ३३००००००.०० |
| ११) रजा पगार | ०.०० | १०९८४०००.०० |
| | **२९१५७५५०.१६** | **८१७१०७९२.०१** |
| शेड्युल - VII रोख व बँकेतील शिल्लक | रू. पै. | रू. पै. |
| १) रोख शिल्लक | १४२३५५६५९.०० | १२८६५२३१४.०० |
| २) चालू खात्यातील शिल्लक (एम.एस.सी. बँक) | २७७३२२९.५५ | ५९१४५०५.३१ |
| ३) चालू खात्यातील शिल्लक (डी.सी.सी बँक) | ५७४८३७८९.४६ | १५२९८९२९३.१७ |
| ४) चालू खात्यातील शिल्लक (राष्ट्रीयकृत बँक) | १५२४३३६४७.३३ | ७४७३९३४९.४४ |
| ५) चालू खात्यातील शिल्लक (इतर बँका) | १६८७००३९५.८६ | २१६८४१५७०.२१ |
| | **५२३७४६७२१.२०** | **५७९१३७०३२.१३** |
| शेड्युल - VIII मागणी व अल्प सुचना ठेवी | २६००००००.०० | ०.०० |
| शेड्युल - IX गुंतवणूक | रू. पै. | रू. पै. |
| १) गव्हर्मेंट सिक्युरीटीजमधील गुंतवणुक | २११६१६०५६२.०० | २१४५१७३३१४.०० |
| २) आदर ॲप्रुव्हड सिक्युरीटीजमधील गुंतवणुक | ०.०० | ०.०० |
| ३) शेअर्समधील गुंतवणुक | २३७०००.०० | २३७०००.०० |
| ४) डिबेंचर्स/बॉण्डसमधील गुंतवणुक | ०.०० | ०.०० |
| **५) इतर गुंतवणुक** | ८६५९७६३७४.०० | १३३५१७६३७४.०० |
| अ) एम.एस.सी. बँक मुदत ठेव | १५०००००.०० | १५०००००.०० |
| ब) डी.सी.सी. बँक मुदत ठेव | ७६१००००००.०० | १२४१००००००.०० |
| क) इतर बँकातील मुदत ठेव | १०३४७६३७४.०० | ९२६७६३७४.०० |
| | **२९८२३७३९३६.००** | **३४८०५८६६८८.००** |

| तपशिल | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ |
|---|---|---|
| शेड्युल - X कर्जे | रू. पै. | रू. पै. |
| **१) अल्प मुदतीची कर्जे** | **२७१०५४८३९४.६२** | **२५६२८४५४०३.२५** |
| अ) तारण कर्जे | २७०६१९३४०२.४२ | २५५९८३८५१७.४५ |
| ब) बिनतारण कर्जे | ४३५४९९२.२० | ३००६८८५.८० |
| **२) मध्यम मुदतीची कर्जे** | **२२३८५९१८३८.३८** | **२२४०४८६५६१.५२** |
| अ) तारण कर्जे | १९५८४२९६१५.२५ | १९८७०३२३५२.०६ |
| ब) बिनतारण कर्जे | २८०१६२२२३.१३ | २५३४५४२०९.४६ |
| **३) दिर्घ मुदतीची कर्जे** | **११६३४४५५८५.००** | **११८५४२४१५८.०५** |
| अ) तारण कर्जे | ११६३४४५५८५.०० | ११८५४२४१५८.०५ |
| | **६११२५८५८१८.००** | **५९८८७५६१२२.८२** |
| शेड्युल - XI येणे व्याज | रू. पै. | रू. पै. |
| १) कर्जावरील येणे व्याज | १५३०७९१८३.१२ | २१७३१९२२५.६४ |
| २) गुंतवणूकीवरील येणे व्याज | ३७५६४८८१.११ | ४०८१५११०.०० |
| ३) आरबीआय एक्स ग्रेशिया पेमेंट रिसिव्हेबल | ०.०० | ३२४७४८५.०० |
| | **१९०६४४०६४.२३** | **२६१३८१८२०.६४** |
| शेड्युल - XII स्थावर मालमत्ता | रू. पै. | रू. पै. |
| १) जमीन व इमारत | ३०३७८९०८.५२ | २९३७६०३४.२० |
| २) फर्निचर फिक्चर | ८३६३०७५५.४२ | ७९२४३१५६.५८ |
| ३) इलेक्ट्रीफिकेशन | ३०३६२९२९.७० | २६३७२९६९.४३ |
| ४) कॉम्प्युटर | २०९५५३९५.७९ | १०११४५०८.२६ |
| ५) व्हेईकल | ५६१८३२४.३२ | ४३५७६२०.०२ |
| ६) लायब्ररी बुक्स् | १०५३७.९२ | ९४९६.०६ |
| ७) नॉन बँकींग असेटस् | ५९७५१०३२.०० | ८५१७००३२.०० |
| ८) पुर्नःमुल्यांकन (जमीन व इमारत) | २८५७०१८८७.२५ | २७३४५१३०२.२५ |
| | ५१६४०९७७०.९२ | ५०८०९५११८.८० |
| शेड्युल - XIII इतर येणी | रू. पै. | रू. पै. |
| १) स्टेशनरी इन स्टॉक | १६९७०४०.१० | १५८३३३९.२४ |
| २) स्टॅम्प इन स्टॉक | १६५८२२.०० | ६११२३.६० |
| ३) टेलिफोन डिपॉझीट | २४७३४९.०० | २४७३४९.०० |
| ४) एम.एस.ई.बी. डिपॉझीट | ५२८८३७.०० | ५२८८३७.०० |
| ५) वाशी महानगरपालिका डिपॉझीट | १३८००.०० | १३८००.०० |
| ६) वॉटर सप्लाय डिपॉझीट | ९५६४३०.०० | ९५६४३०.०० |
| ७) प्राप्तीकर ॲडव्हान्स | ४१२७२५६८.०० | ४७९९९२७७.०० |
| ८) येणे टी.डी.एस. | ४७६८८४.०४ | ६०२४६८.३६ |
| ९) इतर येणी | १०८९६५१७.०६ | १९९३३७९६.४६ |
| १०) वसुली अधिकारी पगारपोटी डिपॉझीट | ३०००.०० | ३०००.०० |
| ११) येणे लॉकर भाडे | ८९१०८३.०० | ०.०० |
| | **५७१४९३३०.२०** | **७१९२९४२०.६६** |

| तपशिल | ३१/०३/२०२० | ३१/०३/२०२१ |
|---|---|---|
| शेड्युल - XIV ठेवी व कर्जावरील दिलेले व्याज | रू. पै. | रू. पै. |
| १) ठेवीवरील | ६३५३९६८६८.२७ | ५७९३६६३१०.७३ |
| २) कर्जावरील | ०.०० | ०.०० |
| | **६३५३९६८६८.२७** | **५७९३६६३१०.७३** |
| शेड्युल - XV पगार, भत्ते, प्रा.फंड इ. | रू. पै. | रू. पै. |
| १) पगार व भत्ते | ८४७६१०७२.०० | ८५१८९४१५.०० |
| २) मेडीकल अलौंन्स | ०.०० | १०९३०००.०० |
